# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/२६२/२०२२ दिनांक :- ७ /९ /२०२२

## परिपत्रक

विषय:- लेखा विभागाकडे अदायगीकामी सादर केल्या जाणा-या देयकांबाबत.

लेखा विभागाकडे विविध विभागांमार्फत वस्तु / सेवा पुरवठा केल्याची देयके अदायगीकामी सादर केली जातात. सदर देयकांची लेखा विभागाकडून तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, वस्तु / सेवा पुरवठादार यांनी वस्तु / सेवा पुरवठा केल्यानंतर ब-याच कालावधीनंतर त्यांची देयके अदायगीकामी विभागामार्फत लेखा विभागाकडे सादर केले जात आहेत. दर वर्षी अंदाजपत्रकामध्ये विविध विभागांना अंदाजपत्रकीय तरतूदी वितरीत करणेत येतात व सदर तरतूदी या त्याच आर्थिक वर्षामध्ये नियोजीत बाबींकरीता खर्च करणे अपेक्षीत असते. परंतु वस्तु / सेवा पुरवठादार यांची देयके विलंबाने अथवा पुढील आर्थिक वर्षात सादर केल्याने चालू आर्थिक वर्षामध्ये सद्यस्थितीत चालू असलेल्या बाबींकरीता तरतूद अपूरी पडण्याची शक्यता असते तसेच मागील वर्षामध्ये तरतूदी अखर्चित राहण्याची शक्यता असते. त्यामुळे खर्चाचे नियोजन बिघडून त्याचा अंदाजपत्रकावर परिणाम होतो. त्या अनुषंगाने सर्व संबंधीत विभागांना सुचीत करण्यात येते की, वस्तु / सेवा पुरवठादार यांनी वस्तु / सेवेचा पुरवठा केल्यानंतर तात्काळ परंतु ४५ दिवसांपेक्षा अधिक नाही अशा वेळेपर्यंत देयके लेखा विभागाकडे अदायगीकामी सादर करावीत तदनंतर सदरची देयके विलंबाने सादर केल्यास मा.आयुक्त सो यांची मान्यता घेतल्याशिवाय लेखा विभागाकडून अदायगी केली जाणार नाही. सदर परिपत्रकाची नोंद सर्व संबंधीत विभागांनी घेणेत यावी व सर्व संबंधीत कर्मचारी व वस्तु / सेवा पुरवठादार यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

( जितेंद्र कौळंबे )
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रत:-

सर्व विभाग